# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास डी.बी.टी.द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करणे बाबतचे मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.उशिसं/शिष्य-२०१८/ईबीसी/७२१२, दि.२२/०६/२०१८ चे परिपत्रक आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी तसेच सदरचे परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

कळावे,

आदेशान्वये,

उपकुलसचिव

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 100
16 JUL 2018

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/ईबीसी/ 7212 दि. २२/०६/२०१८

परिपत्रक

विषय:- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस डी.बी.टी. द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करणेबाबत..

संदर्भ :-
१. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७
२. शासन परिपत्रक क्र. ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दि. १४.०२.२०१८
३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१७/ईबीसी/२०२७, दि. १७.०२.२०१८
४. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र. ३५/तांशि-४, दि. ३१.०३.२०१८
५. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१७/ईबीसी/४४३२, दि. ०९.०४.२०१८

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2
Inward No. 6808
Date 10/07/2018

उपरोक्त विषयाबाबत दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे तसेच काही नवीन अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो.

दि. ३१.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन वार्षिक रुपये ८.०० लाख करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत संचालनालयाच्या संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**दि. ०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४२ अन्वये सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यास अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी आगाऊ स्वरुपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल.** तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस डी.बी.टी. द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्यांची असेल. याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदरच्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या www.dhepune.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(डॉ. मोहन खताळ)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत :- १. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग
सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या विद्यापीठांतील कुलसचिव व महाविद्यालयांतील प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून देणेत याव्यात.

२. कुलसचिव, अकृषि विद्यापीठे
सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांतील प्राचार्य व त्यांचे मार्फत संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणेत याव्यात.

३. प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित, टप्पा अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग तसेच कुलसचिव, अकृषि विद्यापीठे यांचे